# मेट्रोची धाव आता वरळीपर्यंत; महत्त्वाच्या टप्प्याला लवकरच सुरुवात

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** 'कुलाबा- वांद्रे- सिप्झ मेट्रो ३' प्रकल्पातील एका महत्त्वाच्या टप्प्याला या आठवड्यात सुरुवात होणार आहे. सध्या आरे- बीकेसीदरम्यान मेट्रो गाड्यांच्या चाचणी फेऱ्या सुरू आहेत. पण आता मात्र आरे ते वरळीपर्यंत मेट्रो गाड्यांच्या चाचणी फेऱ्यास सुरुवात होणार आहे. रुळ, इतर यंत्रणेची चाचणी करण्यासाठी मेट्रो गाडी वरळीपर्यंत नेण्यात येणार आहे.

'मेट्रो ३' ही मुंबईतील पहिली भुयारी मेट्रो मार्गिका आहे. ३३.५ किमी लांबीच्या या मार्गिकेचे काम सध्या वेगात सुरू असून लवकरच आरे- बीकेसी असा पहिला टप्पा वाहतूक सेवेत दाखल केला जाणार आहे. दरम्यान, ही पहिली भुयारी मेट्रो मार्गिका असल्याने 'एमएमआरसी' अत्यंत काळजीपूर्वक सर्व चाचण्या करीत असल्याचे 'एमएमआरसी'च्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

आतापर्यंत आरे-बीकेसी अशी मेट्रो गाडी चालविली जात आहे . गाडी, रूळ आणि इतर यंत्रणेच्या चाचण्या करण्यात येत आहेत . मात्र या आठवड्यापासून आरे वरळीदरम्यान मेट्रो गाडी चालवून चाचण्या करण्यात येणार असल्याची माहिती 'एमएमआरसी'तील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली .



आरे- बीकेसी दरम्यानचा पहिला टप्पा वाहतूक सेवेत दाखल करण्याच्या अनुषंगाने आतापर्यंत आरे- बीकेसी अशी मेट्रो गाडी चालविली जात आहे. गाडी, रूळ आणि इतर यंत्रणेच्या चाचण्या करण्यात येत आहेत. आता मात्र या आठवड्यापासून आरे- वरळीदरम्यान मेट्रो गाडी चालवून चाचण्या करण्यात येणार असल्याची माहिती 'एमएमआरसी'तील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

**सर्व यंत्रणांची कामे पूर्ण**

आरे- कुलाबादरम्यानचे भुयारीकरण आणि रुळाचे काम याआधीच पूर्ण झाले आहे. तर वरळीपर्यंत सिग्नलसह इतर यंत्रणेची कामेही पूर्ण झाली आहेत. महत्त्वाचे म्हणजे बीकेसी- वरळी असा दुसरा टप्पा येत्या काही महिन्यांत 'एमएमआरसी'ला वाहतूक सेवेत दाखल करावयाचा आहे. त्यामुळे विविध प्रकारच्या चाचण्या करण्यासाठी आता थेट वरळीपर्यंत मेट्रो गाडी नेण्यात येणार आहे. येत्या चार-पाच दिवसांत पहिल्यांदा आरे- वरळी अशी मेट्रो गाडी धावणार आहे.